शिक्षण विभाग(प्राथमिक),जि.प.नाशिक
जि.प.भवन,त्र्यंबक नाका,नाशिक ४२२००१
दुरध्वनी कमांक(कार्यालय) ☎-०२५३-२५०८०७५ e mail-mdmnashik@gmail.com

---

शिक्षण विभाग,(प्राथ) जि.प. नाशिक
जा.क्रं.जिपना/शिक्षण/प्राथ-२/ २६० / २०१७.
नाशिक दिनांक :-१८/ ०६/ २०१७.

प्रति,
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती----------------(सर्व)

**विषय:-** जिल्हा परिषद नाशिकच्या प्राथमिक शिक्षक,पदवीधर प्राथमिकशिक्षक, मुख्याध्यापक,संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या सन-२०१७ करीता अंतिम वास्तव्य जेष्ठता याद्या प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.७/ आस्था-१४ दिनांक-२७/०२/२०१७
२) महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.७/ आस्था-१४ दिनांक-१५ एप्रिल २०१७
३) मा.अवर सचिव,ग्राम विकास व जलसंधारण विभाग, यांचे कडील पत्र क्र.जिपब / ४८१७ /(प्र.क्र.७/२०१७/आस्था-१४ दि.३१/५/२०१७
४) या कार्यालयाचे पत्र क्र.शिक्षण/प्राथ-२/२४८/२०१७ दिनांक-०७/०६/२०१७

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद नाशिकच्या प्राथमिक शिक्षक,पदवीधर प्राथमिकशिक्षक, मुख्याध्यापक, संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या सन-२०१७ करीता प्रारुप वास्तव्य जेष्ठता याद्या प्रसिध्द करणेबाबत संदर्भ क्र.३ अन्वये निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ अन्वये प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिकशिक्षक, मुख्याध्यापक, या संवर्गाच्या बदलीपात्र व बदलीस अधिकारप्राप्त शिक्षकांच्या प्रारुप वास्तव्य जेष्ठता याद्या मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या WP No 5405/2017 WP(st) No.14280/2017, WP(st) No.14256/2017, WP No.5618/2017, WP No 5693/2017 इत्यादी न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या निर्णयास अधिनराहून दिनांक ०७/०६/२०१७ रोजी zpnashik.maharasatra.gov. in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. तसेच आपल्या mdm या gmail id वर पाठविण्यात आलेल्या होत्या. सदर प्रारुप वास्तव्य जेष्ठता याद्या आपल्या गटात प्रसिध्द करुन आपल्या गटातील कार्यरत प्राथमिक शिक्षक, पदविधर प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक यांचे निदर्शनास आणून याद्यांबाबत बाबत कोणाचे आक्षेप/हरकती असल्यास पुराव्यासह दिनांक १४/०६/२०१७ रोजी प्रत्यक्ष खास दूतामार्फत आपल्या अभिप्रायासह सादर करणे बाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार प्राथमिक शिक्षक, पदविधर प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक यांचे प्राप्त आक्षेप/हरकतीबाबत गटशिक्षणाधिकारी यांचेकडील अहवालानुसार अंतीम वास्तव्य जेष्ठता याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत.

सदरच्या अंतीम वास्तव्य जेष्ठता याद्या, वरील प्रमाणे मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या निर्णयास अधिन राहून आज दि.१८/६/२०१७ रोजी zpnashik.maharasatra.gov. in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. तसेच सदरच्या याद्या आपल्या गटाच्या mdm या gmail id वर पाठविण्यात येत आहेत. तरी सदरच्या अंतीम वास्तव्य जेष्ठता याद्यांना आपल्यास्तरावरुन जास्तीतजास्त प्रसिध्दी देण्यात यावी. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. प्रकरणी अनियमितता झाल्यास त्यास आपण जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद,नाशिक
करिता

प्रत-मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांना माहितीस्तव सादर.
मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि) जि.प.नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner